मुंबई महापालिकेला दंड

वॉर्ड बॉय, सफाई कामगारांकडून ईसीजी काढल्याच्या प्रकाराची मानवाधिकार आयोगाकडून दखल

- शताब्दी रुग्णालयातील प्रकाराविरोधात तक्रार
- दंडाची रक्कम एका महिन्या देण्याचा आदेश
- महापालिकेला अनुपालन अहवालही दाखल करावा लागणार

रमेश खोकराळे
ramesh.khokrale@timesofindia.com

देशातील श्रीमंत महापालिकेत ही अवस्था!

'हा प्रकार पाहिल्यानंतर देशातील काही भागांत बनावट डॉक्टरांकडून रुग्णांना वैद्यकीय उपचार दिले जात असल्याच्या वस्तुस्थितीची आठवण झाली. परंतु, देशातील श्रीमंत महापालिकेत अशी अवस्था का, हे अनाकलनीय आहे. शस्त्रक्रिया होणार असलेल्या रुग्णांची शस्त्रक्रियेदरम्यान आणि नंतरही योग्य ती काळजी घेण्याच्या उद्देशाने ईसीजी केला जातो. त्यामुळे ती अत्यंत गांभीर्यपूर्वक होणे गरजेचे असते. परंतु, महापालिकेच्या या रुग्णालयात रुग्णांच्या जिवाशी खेळला जाणारा हा खेळ धक्कादायक आहे', असे निरीक्षण आयोगाने आदेशात नोंदवले.

मुंबई : मुंबई महापालिकेच्या पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयात रुग्णांची हृदयाची स्थिती तपासण्यासाठी आवश्यक ईसीजी चाचणी चक्क वॉर्ड बॉय व सफाई कामगारांकडून केली जात असल्याच्या धक्कादायक प्रकाराची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली. तसेच रुग्णांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा ठपका ठेवत आयोगाने मुंबई महापालिकेला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला. ही रक्कम महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाला एक महिन्यात देण्याचा आदेश दिला आहे.

'शताब्दी रुग्णालयात तत्काळ प्रशिक्षित ईसीजी तंत्रज्ञ उपलब्ध करावेत. तसेच भरपाई म्हणून निश्चित केलेली १२ लाखांची रक्कम विधी प्राधिकरणाकडे एका महिन्यात जमा न केल्यास ती रक्कम प्रत्यक्षात दिली जाईपर्यंत वार्षिक आठ टक्के व्याज लागू होईल. या आदेशाची प्रत महापालिका आयुक्तांकडे तत्काळ पाठवण्यात यावी आणि महापालिकेने एका महिन्यात निर्देशांचे पालन केल्याचा अनुपालन अहवाल दाखल करावा', असेही आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती ए. एम. बदर यांनी याविषयीच्या तक्रारीवरील सुनावणीअंती बुधवारी दिलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी पाटील यांनी हा प्रकार छायाचित्रांच्या पुराव्यांनिशी निदर्शनास आणला होता. 'शस्त्रक्रिया नियोजित असलेल्या रुग्णांचा ईसीजीही वॉर्ड बॉय व सफाई कामगारांकडून केली जातो. असे करून रुग्णांचे आरोग्यच धोक्यात आणले जात आहे', असे म्हणणे त्यांनी मांडले. त्यानंतर आयोगाने रुग्णांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारीबाबत सत्यशोधन चौकशी करून अहवाल दाखल करण्याचे निर्देश आयुक्तांना दिले होते. मात्र, त्याऐवजी महापालिकेतर्फे मुख्य वैद्यकीय अधिकारी व अन्य डॉक्टरांचा अभिप्राय सादर करण्यात आला. तसेच शताब्दी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. राजश्री वायाळ यांनी महापालिकेतर्फे बाजू मांडली.

'प्रशिक्षित कर्मचारी' यांच्याकडून ती चाचणी केली जात असल्याचे अभिप्रायात सांगण्यात आले. त्यामुळे 'प्रशिक्षित कर्मचारी याचा अर्थ काय? ईसीजी मशिन हाताळण्याचे औपचारिक प्रशिक्षण घेतलेले आणि तसे व्यावसायिक प्रशिक्षण असलेले कर्मचारी आहेत का?', अशी विचारणा आयोगाने केली. त्यावर, 'ईसीजी तंत्रज्ञाचे पद वर्षभरापासून रिक्त आहे. त्यामुळे वॉर्ड बॉयकडून ते काम केले जाते. प्रदीर्घ सेवेमुळे वॉर्ड बॉय ते काम करू शकतात', असे उत्तर महापालिकेतर्फे देण्यात आले. त्यानंतर तक्रारीत तथ्य असल्याचा निष्कर्ष आयोगाने नोंदवला.

...म्हणून विधी प्राधिकरणाला भरपाईची रक्कम

'जानेवारी ते ऑगस्ट-२०२५ या आठ महिन्यांत अशा अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून ३,३४४ ईसीजी करण्यात आल्याचे दिसत आहे. आरोग्य व्यवस्थेकडे हे अक्षम्य दुर्लक्ष आहे. त्यामुळे भरपाईचा आदेश आवश्यक आहे. परंतु, ते रुग्ण अज्ञात आहेत. अशा परिस्थितीत गरीब व गरजू लोकांना मोफत विधी सहाय्य देणाऱ्या विधी प्राधिकरणाला भरपाईची रक्कम देण्याचा आदेश देण्यात येत आहे', असे न्या. बदर यांनी आदेशात नमूद केले.